विद्याविकास
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.
स्वररंग
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
डॉ. अभिजीत कुलकर्णी
संचालक

संदर्भ क्र. विविमं/२०२३–२४/०२० **अंतिम मुदत वाढ** दिनांक : ३१/०७/२०२३.

प्रति,
मा. प्राचार्य/ मा. संचालक,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था.

विषय : **शैक्षणिक वर्ष २०२३–२४ करिता कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना, विद्यार्थी कल्याण अधिकारी व इतर प्रस्ताव ऑनलाईन प्रस्ताव पाठविण्यास मुदत वाढ.**

संदर्भ : १. या विभागाचे विविमं/२०२३–२४/००२, दिनांक ०३/०७/२०२३ चे पत्र.
२. या विभागाचे विविमं/२०२३–२४/०१६, दिनांक २२/०७/२०२३ चे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय पत्र क्र. २ ला अनुसरून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थांमधून शैक्षणिक वर्ष २०२३–२४ मध्ये विद्यार्थी विकास मंडळाच्या कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना विद्यार्थी कल्याण अधिकारी व इतर प्रस्ताव ऑनलाईन पद्धतीने सोमवार, दिनांक ३१ जुलै, २०२३ पर्यंत भरण्याबाबत कळविण्यात आले होते.

वरील संदर्भीय पत्राच्या अधिन राहून योजना व उपक्रमांचे **ऑनलाईन पद्धतीने प्रस्ताव भरण्याची मुदत सोमवार, दि. ०७ ऑगस्ट, २०२३ पर्यंत वाढविण्यात येत आहे.** ऑनलाईन (Online) पद्धतीने भरलेल्या योजना व उपक्रमांच्या अर्जाची प्रिंट काढून त्यावर मा. प्राचार्य/संचालक यांची स्वाक्षरी घेऊन सदर स्वाक्षरी असलेले अर्ज स्कॅन करून तिथेच अपलोड करणे अनिवार्य आहे. त्यानुसार विद्यार्थी विकास मंडळाकडे ऑनलाईन (Online) पद्धतीने अपलोड होणारे प्रस्तावच पुढील प्रक्रियेकरिता विचाराधीन असतील.

महाविद्यालय/परिसंस्था, विद्यापीठ विभागांकडून वरीलप्रमाणे प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांवर शासन व विद्यापीठ निर्देशांच्या अधिन राहून कुठल्याही स्तरावर विचाराधीन, अनिर्णित, मान्य, अमान्य अथवा व्यपगत करण्याची/मानण्याची कार्यवाही केली जाऊ शकते. सद्यस्थितित या विविध योजना/उपक्रम यांचे प्रस्ताव आमंत्रित आहेत. या विविध योजना व उपक्रमांकरिता आवश्यक असलेली विद्यापीठ मान्यता मिळाल्यानंतरच संबंधित योजना व उपक्रमांची अंमलबजावणी करावी.

आपण संबंधित विभागांना/शिक्षकांना **सोमवार, दि. ०७ ऑगस्ट, २०२३ या वाढीव मुदतीत ऑनलाईन पद्धतीने वरीलप्रमाणे विविध योजना/उपक्रमांचे प्रस्ताव भरण्याबाबत** योग्य ती कार्यवाही करण्याबाबत अवश्य सूचित करावे. कळावे, ही विनंती.

सोबत : वरीलप्रमाणे.

**ऑनलाईनबाबत अधिक माहिती व मदतीसाठी : ०२०–७१५३३६३३**
Email: nssbsdsupport@pun.unipune.ac.in
**विद्यार्थी विकास मंडळ कार्यालयीन अधिक माहितीसाठी : ०२०–२५६२२६८०/८१**

**(डॉ. अभिजीत कुलकर्णी)**
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

डॉ. अभिजीत कुलकर्णी
संचालक

संदर्भ क्र. विविमं/२०२३–२४/०१६ **मुदत वाढ** दिनांक : २२/०७/२०२३.

प्रति,
मा. प्राचार्य/ मा. संचालक,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था.

विषय : **शैक्षणिक वर्ष २०२३–२४ करिता कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना, विद्यार्थी कल्याण अधिकारी व इतर प्रस्ताव ऑनलाईन प्रस्ताव पाठविण्यास मुदत वाढ.**

संदर्भ : या विभागाचे विविमं/२०२३–२४/००२, दिनांक ०३/०७/२०२३ चे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थांमधून शैक्षणिक वर्ष २०२३–२४ मध्ये विद्यार्थी विकास मंडळाच्या कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना विद्यार्थी कल्याण अधिकारी व इतर प्रस्ताव ऑनलाईन पद्धतीने शनिवार, दिनांक २२ जुलै, २०२३ पर्यंत भरण्याबाबत कळविण्यात आले होते.

वरील संदर्भीय पत्राच्या अधिन राहून योजना व उपक्रमांचे **ऑनलाईन पद्धतीने प्रस्ताव भरण्याची मुदत सोमवार, दि. ३१ जुलै, २०२३ पर्यंत वाढविण्यात येत आहे**. ऑनलाईन (Online) पद्धतीने भरलेल्या योजना व उपक्रमांच्या अर्जाची प्रिंट काढून त्यावर मा. प्राचार्य/संचालक यांची स्वाक्षरी घेऊन सदर स्वाक्षरी असलेले अर्ज स्कॅन करून तिथेच अपलोड करणे अनिवार्य आहे. त्यानुसार विद्यार्थी विकास मंडळाकडे ऑनलाईन (**Online**) पद्धतीने अपलोड होणारे प्रस्तावच पुढील प्रक्रियेकरिता विचाराधीन असतील.

महाविद्यालय/परिसंस्था, विद्यापीठ विभागांकडून वरीलप्रमाणे प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांवर शासन व विद्यापीठ निर्देशांच्या अधिन राहून कुठल्याही स्तरावर विचाराधीन, अनिर्णित, मान्य, अमान्य अथवा व्यपगत करण्याची/मानण्याची कार्यवाही केली जाऊ शकते. सद्यस्थितित या विविध योजना/उपक्रम यांचे प्रस्ताव आमंत्रित आहेत. या विविध योजना व उपक्रमांकरिता आवश्यक असलेली विद्यापीठ मान्यता मिळाल्यानंतरच संबंधित योजना व उपक्रमांची अंमलबजावणी करावी.

आपण संबंधित विभागांना/शिक्षकांना **सोमवार, दि. ३१ जुलै, २०२३ या वाढीव मुदतीत ऑनलाईन पद्धतीने वरीलप्रमाणे विविध योजना/उपक्रमांचे प्रस्ताव भरण्याबाबत** योग्य ती कार्यवाही करण्याबाबत अवश्य सूचित करावे. कळावे, ही विनंती.

सोबत : वरीलप्रमाणे.

**ऑनलाईनबाबत अधिक माहिती व मदतीसाठी : ०२०–७१५३३६३३**
Email: nssbsdsupport@pun.unipune.ac.in
**विद्यार्थी विकास मंडळ कार्यालयीन अधिक माहितीसाठी : ०२०–२५६२२६८०/८१**

(डॉ. अभिजीत कुलकर्णी)
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

विद्याविकास

स्वरंग

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

डॉ. अभिजीत कुलकर्णी
संचालक

संदर्भ क्र. विविमं/२०२३–२४/००२ दिनांक : ०३/०७/२०२३.

प्रति,
मा. प्राचार्य/ मा. संचालक
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था.

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२३–२४ करिता कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना, विद्यार्थी कल्याण अधिकारी व इतर प्रस्ताव ऑनलाईन पाठविण्याबाबत.**

महोदय/महोदया,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेली सर्व महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थामधून नियुक्त करण्यात आलेले विद्यार्थी कल्याण अधिकारी (SWO) यांची सभा माहे जुलै/ऑगस्ट, २०२३ मध्ये आयोजित करण्यात येणार आहे. सदर सभेत शैक्षणिक वर्ष २०२३–२४ मध्ये विद्यार्थी विकास मंडळातर्फे राबविण्यात येणाऱ्या योजनांची आपण सादर केलेल्या प्रस्तावानुसार नियोजन करण्यात येणार आहे.

विद्यार्थी हिताच्यादृष्टीने व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ध्येय, धोरणांना अनुसरून विद्यार्थी विकास विषयक योजना व उपक्रमांचे महत्त्व व उपयोगिता अनन्यसाधारण आहेच; या शैक्षणिक वर्षात या विभागाद्वारे राबविल्या जाणाऱ्या विद्यार्थी विकास विषयक योजना व उपक्रमांचे प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी महाविद्यालय/परिसंस्थाकडून आमंत्रित आहेत.

**विद्यार्थी कल्याण अधिकारी (SWO) नियुक्ती :**

विद्यापीठ नियमाप्रमाणे विद्यार्थी विकास मंडळाच्या विविध योजना, इतर सहशैक्षणिक, उपशैक्षणिक व विस्तार उपक्रम राबवण्याकरिता महाविद्यालयात/परिसंस्थेत पूर्णवेळ विद्यार्थी कल्याण अधिकारी (SWO) नियुक्ती करणे आवश्यक आहे.

अ) विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रस्तावाची प्रथम पूर्तता/नियुक्ती केल्यानंतरच विद्यार्थी विकास मंडळाच्या विविध योजना/उपक्रम/विविध कक्षांची माहिती, अहवाल तसेच या विभागाशी निगडीत प्रस्तावाच्या इतर लिंक उपलब्ध होतील.

ब) ज्या महाविद्यालय/परिसंस्थेतील विद्यार्थी कल्याण अधिकारी यांच्या ३ वर्षे कालावधीची मान्यता संपुष्टात आलेली नाही, अशा विद्यार्थी कल्याण अधिकारी यांनी प्रस्ताव दाखल करण्याची आवश्यकता नाही.

जर

क) शैक्षणिक वर्ष २०२३–२४ पासून प्रथमत: नव्याने विद्यार्थी कल्याण अधिकारी नियुक्त करावयाचा आहे.

किंवा

ड) महाविद्यालय/परिसंस्थांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२३–२४ पासून विद्यार्थी कल्याण अधिकारी बदल करावयाचा आहे.

किंवा

इ) शैक्षणिक वर्ष २०२२–२३ या कालावधीपर्यंत ज्या महाविद्यालय/परिसंस्थेतील विद्यार्थी कल्याण अधिकारी यांना मान्यता देण्यात आली असून या वर्षी ज्या अधिकाऱ्यांचा कालावधी पूर्ण होऊन मान्यता संपुष्टात आली आहे अशा विद्यार्थी कल्याण अधिकारी मुदतवाढ (Continuation)/ बदल करावयाचा आहे.

अशाच महाविद्यालय/परिसंस्थांनी विद्यार्थी कल्याण अधिकारी नियुक्ती करणे आवश्यक असून सदर प्रस्ताव (www. unipune.ac.in – Students' Developement – BSD Online – College Login –For College Users – Login – Main Menu – Students Developement- SWO Approval–Add New) येथे ऑनलाईन पद्धतीने भरण्याबाबत संबंधितांना सूचित करावे. आपण यासाठी सोबत जोडलेल्या नियमावलीचे अवलोकन करावे.

*सदर विद्यार्थी कल्याण अधिकारी ऑनलाईन प्रस्ताव भरताना* तदर्थ (**Adhoc**) स्वरूपात/तासिका तत्वावरील अध्यापकांनी विद्यापीठाच्या शैक्षणिक (**Academic**) विभागाकडून तदर्थ (**Adhoc**) स्वरूपात/तासिका तत्वावरील शिक्षक मान्यता पत्र मिळालेले नसल्यास संस्थेच्या नियुक्त आदेशाची १ **MB** पर्यंत **PDF** फाईल. *अपलोड करणे अनिवार्य आहे.* तसेच विद्यापीठाच्या शैक्षणिक (**Academic**) विभागाकडून संबंधितांस पूर्णवेळ शिक्षक मान्यता मिळालेली असल्यास संबंधितांच्या प्रस्तावास पूर्णवेळ शिक्षक मान्यता लिंक करण्यात आलेली असून ती अपलोड करण्याची आवश्यकता नाही, याची नोंद घ्यावी.

याला अनुसरून प्रस्तुत पत्राच्या अधिन राहून शैक्षणिक वर्ष २०२३–२४ या कालावधीतच राबविण्याकरिता आपणांकडून विहित पद्धतीने पुढील प्रस्ताव आमंत्रित आहेत.

योजना व उपक्रमाचे प्रस्ताव भरताना;

| | |
|---|---|
| १. विद्यार्थी विकास कक्ष, (Students' Development Cell)<br>२. समान संधी कक्ष, (Equal opportunity Cell)<br>३. महाविद्यालय तक्रार निवारण कक्ष (College Grievance Redressal Cell)<br>४. ॲन्टी रॅगिंग समितीचा प्रथम सत्राचा अहवाल (Anti Ragging Report) | या सर्व कक्षांच्या स्थापना करून खालीलप्रमाणे माहिती भरल्यानंतरच सर्व योजना व उपक्रमाचे अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरण्यासाठी उपलब्ध होतील. |
| ५. विद्यार्थी विकास मंडळाच्या कार्यरत बँक खात्याची माहिती | विद्यार्थी विकास मंडळाच्या कार्यरत बँक खात्याची माहिती अद्ययावत असल्याबाबतची (College Profile - Infra.&Fin.Details - Finance Bank Detaila) येथे पडताळणी करणे अनिवार्य आहे. |

वरील कक्षांची स्थापना करून ऑनलाईन पद्धतीने या सर्व कक्षांच्या अध्यक्ष/सदस्यांची माहिती (www. unipune.ac.in –Students' Developement –BSD Online – College Login–For College Users –Login – Main Menu–Students Developement–Menu– Statutory Committee's ) येथे भरणे आवश्यक आहे. या कक्षांच्या स्थापनेची प्रिंट काढून महाविद्यालय/परिसंस्थेकडे जतन करावी. या कक्षांच्या भरलेल्या माहितीची प्रिंट अपलोड करण्याची सुविधा सध्या उपलब्ध नसून याबाबत आपणास पुढील कालावधीत स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

पुढील योजना व उपक्रमाचे ऑनलाईन प्रस्ताव भरताना खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे अर्जामध्ये योजनेच्या अनुषंगाने माहितीची PDF फाईल (१ MB पर्यंत) अपलोड करणे अनिवार्य आहे.

| | | | अपलोड करावयाच्या फाईलबाबत माहिती |
|---|---|---|---|
| ०१ | नियुक्ती प्रस्ताव | नव्याने विद्यार्थी कल्याण अधिकारी नियुक्ती | *सदर ऑनलाईन प्रस्ताव भरताना* तदर्थ **(Adhoc)** स्वरूपात/तासिका तत्वावरील अध्यापकांनी विद्यापीठाच्या शैक्षणिक **(Academic)** विभागाकडून तदर्थ **(Adhoc)** स्वरूपात/तासिका तत्वावरील शिक्षक मान्यता पत्र मिळालेले नसल्यास संस्थेच्या नियुक्त आदेशाची १ **MB** पर्यत **PDF** फाईल. *अपलोड करणे अनिवार्य आहे.*<br>तसेच संबंधितांस पूर्णवेळ शिक्षक मान्यता विद्यापीठाच्या शैक्षणिक **(Academic)** विभागाकडून मिळालेली असल्यास संबंधितांच्या प्रस्तावास पूर्णवेळ शिक्षक मान्यता लिंक करण्यात आलेली असून ती अपलोड करण्याची आवश्यकता नाही, याची नोंद घ्यावी. |
| ०२ | योजना | कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना | |
| ०३ | इतर उपक्रम | कला, संस्कृती व साहित्य विषयक सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत प्रायोगिक, केवल, अभिव्यक्त, दृक्‌श्राव्य कला प्रकार, इतर पूरक उपक्रम, शिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, नव उद्योजक शिबिर, लिंगभाव समानता विषयक कार्यशाळा, लेखन कार्यशाळा, नव लेखक शिबिर,<br>दिव्यांग व विशेष व्यक्ती कार्यशाळा, कौशल्य विकास पूरक उपक्रम, नव उद्योजकता तथा व्यवसाय समुपदेशन, व्यक्तिमत्व विकासपूरक समुपदेशन, सांस्कृतिक आदान–प्रदान कार्यक्रम<br>अभिरूप स्वराज्य संस्था, प्रशासन, संसद, न्यायालय,<br>अशा विषय क्षेत्रांना अनुसरून;<br>**विषयाचा परिचय, मार्गदर्शन, प्रशिक्षण, सराव,प्रयोग/अभिव्यक्ती अशा स्तरांचे उपक्रम/कार्यक्रम** | प्रस्तावित उपक्रम/कार्यक्रमांचा आराखडा (उद्देश, तज्ञ व्यक्ती, संसाधन व्यक्ती यांची नावे व घेण्यात येणाऱ्या उपक्रम/कार्यक्रमाचे स्वरूप तपशील), उपक्रम/कार्यक्रमांचा प्रस्तावित दिनांक व आराखडा |
| ०४ | | निर्भय कन्या अभियान | योजनेअंतर्गत प्रस्तावित उपक्रमाचा तपशील. |
| ०५ | | आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण | योजनेअंतर्गत प्रस्तावित उपक्रमाचा तपशील. |

यानंतर ऑनलाईन (Online) पद्धतीने भरलेल्या योजना व उपक्रमांच्या अर्जाची प्रिंट काढून त्यावर मा. प्राचार्य/संचालक यांची स्वाक्षरी घेऊन सदर स्वाक्षरी असलेले अर्ज स्कॅन करून तिथेच अपलोड करणे अनिवार्य आहे. त्यानुसार विद्यार्थी विकास मंडळाकडे ऑनलाईन (Online) पद्धतीने अपलोड होणारे प्रस्तावच पुढील प्रक्रियेकरिता विचाराधीन असतील.

शैक्षणिक वर्ष २०२३—२४ मध्ये आपल्या महाविद्यालयात/परिसंस्थेत विद्यापीठ नियमाप्रमाणे राबविण्यात येणारी कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना प्रस्ताव, विद्यार्थी कल्याण अधिकारी नियुक्ती आणि इतर प्रस्ताव असे विद्यापीठ संकेतस्थळावर (www. unipune.ac.in – Students' Developement – BSD Online – College Login –For College Users – Login – Main Menu – Students Developement) येथे ऑनलाईन पद्धतीने भरण्याबाबत संबंधितांना सूचित करावे. प्रस्तुत पत्राच्या अधिन राहून आपण सादर करू इच्छित असलेल्या कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना, विद्यार्थी कल्याण अधिकारी नियुक्ती व इतर योजना व उपक्रमांच्या प्रस्तावाची लिंक **शनिवार, दिनांक २२ जुलै, २०२३ रोजी सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहिल.**

त्यानंतर आपल्या प्रस्तावावर विद्यार्थी विकास मंडळ विभागाकडून पुढील योग्य ती कार्यवाही करून महाविद्यालय/परिसंस्थेच्या वेबमेल (Webmail) वर तसेच संबंधित विद्यार्थी कल्याण अधिकारी यांच्या टिचर्स प्रोफाईल (Teachers Profile) मधील नोंदणीकृत मेल आयडीवर याचबरोबर विद्यापीठ संकेतस्थळावर पुढीलप्रमाणे **(www.unipune.ac.in–Students' Developement – BSD Online–College Login –For College Users – Login – Main Menu –Students Development – Menu–Download All Schemes approvals)** येथे ऑनलाईन संमती/मंजूरी पत्र देण्याची व्यवस्था तयार केली आहे.


महाविद्यालय/परिसंस्था, विद्यापीठ विभागांकडून वरीलप्रमाणे प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांवर शासन व विद्यापीठ निर्देशांच्या अधिन राहून कुठल्याही स्तरावर विचाराधीन, अनिर्णित, मान्य, अमान्य अथवा व्यपगत करण्याची/मानण्याची कार्यवाही केली जाऊ शकते.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या नियुक्त विद्यार्थी कल्याण अधिकारी (SWO) यांची सभा लवकरच आयोजित करण्यात येणार असून त्याला अनुसरून प्रस्तुत पत्रासंदर्भात योग्य ती कार्यवाही करण्याबाबत आपण संबंधित विभागांना/शिक्षकांना अवश्य सूचित करावे. कळावे, ही विनंती.

सोबत : वरीलप्रमाणे.

**ऑनलाईनबाबत अधिक माहिती व मदतीसाठी : ०२०—७१५३३६३३**
Email: nssbsdsupport@pun.unipune.ac.in

**विद्यार्थी विकास मंडळ कार्यालयीन अधिक माहितीसाठी : ०२०—२५६२२६८०/८१**



**(डॉ. अभिजीत कुलकर्णी)**
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ